# KJMC FINANCIAL SERVICES LIMITED

NBFC : No. B-13.01633

KJMC FINSERV
MONEY MATTERS

**May 31, 2026**

To
The Department of Corporate Services - CRD,
**BSE Limited**,
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai – 400 001

**BSE Scrip Code: 530235**

**Subject: Newspaper Clipping of Audited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter and Year ended March 31, 2026.**

Dear Sir/Madam,

In compliance with Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed herewith the copy of Newspaper Advertisement w.r.t the Audited Standalone and Consolidated Financial Results of the Company for the Quarter and Year ended March 31, 2026, published in **"Financial Express" (English)** and **"Pratahkal" (Marathi)** on May 31, 2026.

The said newspaper advertisement provides a Quick Response (QR) Code to access complete financial results for the said period.

The above is also available on Company's website: https://www.kjmcfinserv.com

This is for your kind information and records.

**Yours faithfully,**
For **KJMC Financial Services Limited**

OMKAR RAGHUNATH BAMNE
Digitally signed by OMKAR RAGHUNATH BAMNE
Date: 2026.05.31 15:34:50 +05'30'

**Omkar Bamne**
**Company Secretary & Compliance Officer**
**M. No: A77772**

**Encl: As above**

# इंधन दरवाढीविरोधात काँग्रेसचे आंदोलन; 'सामान्य जनतेची लूट बंद करा'च्या घोषणा



**धाराशिव, दि. ३० (वार्ताहर) :** पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या सातत्याने वाढणाऱ्या दरांविरोधात काँग्रेस पक्षाच्या वतीने शुक्रवारी देशपांडे स्टॅण्ड येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत इंधन दरवाढ तात्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली. 'महागाई करणारे सरकार हाय हाय', 'सामान्य जनतेची लूट बंद करा', 'शेतकरीविरोधी सरकारचा निषेध असो' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला सविस्तर निवेदन देण्यात आले. निवेदनात मागील काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये झालेल्या वाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडल्याचा आरोप करण्यात आला. वाढत्या इंधन दरांचा थेट परिणाम वाहतूक खर्चावर होत असून त्यातून अन्नधान्य, भाजीपाला, किराणा माल आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले.

काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर टीका करत कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय दरांमध्ये अपेक्षित वाढ नसतानाही देशांतर्गत इंधन दर सातत्याने वाढत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. इंधनावरील विविध कर आणि अधिभारामुळे नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

शेतकरी वर्गावरही या दरवाढीचा मोठा परिणाम होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. शेती मशागत, पाणीपुरवठा आणि वाहतूक यासाठी डिझेल अत्यावश्यक असून वाढत्या दरांमुळे उत्पादन खर्च वाढत आहे. त्यामुळे आधीच विविध संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर नवे आर्थिक आव्हान उभे राहिल्याचे त्यांनी म्हटले.

घरगुती गॅसच्या वाढत्या किमतींमुळे महिलांवर आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवर अतिरिक्त भार पडत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचे उत्पन्न स्थिर असताना खर्च मात्र झपाट्याने वाढत असल्याने सामान्य कुटुंबांचे मासिक बजेट विस्कळीत झाले असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसची दरवाढ तात्काळ मागे घ्यावी, इंधनाचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात तसेच महागाई नियंत्रणासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी शासनाकडे केली. आंदोलनात जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर, खलील सय्यद, प्रशांत पाटील, शहाजी मुंडे, उस्मान कुरेशी, संग्राम मुंडे, अशोक बनसोडे, गोरोबा झेंडे, मिलिंद गोवर्धन, शौकत मौलाना, वसंत मडके, दादासाहेब गायकवाड, संजय सरवदे, शिवाजी गायकवाड, अभिषेक बागल, धनंजय राऊत यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.


## आरएचआय मॅग्नेसिटा इंडिया लिमिटेड

RHI MAGNESITA

सीआयएन : एल२८११३एमएच२०१०पीएलसी३१२८७१
नोंदणीकृत कार्यालय : युनिट क्र. ७०५, ७ वा मजला, लोढा सुप्रीमस, कांजुरमार्ग व्हिलेज रोड, कांजुरमार्ग पूर्व, मुंबई, महाराष्ट्र – ४०००४२
फोन क्र. : +९१-२२-६६०९०६००; फॅक्स क्र. : +९१-२२-६६०९०६०१
Email : corporate.india@rhimagnesita.com; Website : www.rhimagnesitaindia.com

### ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षासाठी स्वतंत्र आणि एकत्रित आर्थिक निकालांचा उतारा

(रक्कम रु. लाखांमध्ये, अन्यथा नमूद केल्याशिवाय)

| अ. क्र. | तपशील | स्वतंत्र | | | | एकत्रित | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तिमाही समाप्त ३१ मार्च २०२६ | तिमाही समाप्त ३१ मार्च २०२५ | वर्ष समाप्त ३१ मार्च २०२६ | वर्ष समाप्त ३१ मार्च २०२५ | तिमाही समाप्त ३१ मार्च २०२६ | तिमाही समाप्त ३१ मार्च २०२५ | वर्ष समाप्त ३१ मार्च २०२६ | वर्ष समाप्त ३१ मार्च २०२५ |
| | | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| १. | कामकाजातून मिळणारे उत्पन्न | ७८,५७१.०२ | ७५,५४५.४२ | ३३५,६३८.७८ | २८९,१८६.०१ | ९३,२२५.९० | ९१,७९६.८० | ४०१,९९४.५० | ३६७,४४९.५० |
| २. | कालावधी/वर्षासाठी निव्वळ नफा करापूर्वी आणि अपवादात्मक बाबींपूर्वी | ५,०४२.०८ | ५,०८०.७६ | २६,०५६.७९ | ३०,०८६.३४ | ५,३२१.२५ | ३,७८२.७४ | २३,६४६.७३ | २६,२६५.८१ |
| ३. | अपवादात्मक बाब # | ६६,०९२.१० | - | ६६,०९२.१० | - | ५५,६२४.०३ | - | ५५,६२४.०३ | - |
| ४. | कालावधी/वर्षासाठी निव्वळ तोटा/नफा करानंतर आणि अपवादात्मक बाबींनंतर # | (६२,४४१.९४) | ३,६३९.२८ | (४६,७९८.५९) | २२,३००.२९ | (५१,८१०.८०) | ३,६१८.२१ | (३८,२९३.७८) | २०,२५१.२८ |
| ५. | कालावधी/वर्षासाठी एकूण सर्वसमावेशक तोटा/उत्पन्न [कालावधी/वर्षासाठी तोटा/नफा (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) यांचा समावेश] | (६२,५१८.२९) | ३,५९२.१३ | (४६,९३१.९५) | २२,२६९.७८ | (५१,९१३.८५) | ३,५२३.६० | (३८,४८७.६१) | २०,१७२.८२ |
| ६. | इक्विटी शेअर भांडवल (प्रत्येकी रु. १/- दर्शनी मूल्याचा शेअर) | २,०६५.०१ | २,०६५.०१ | २,०६५.०१ | २,०६५.०१ | २,०६५.०१ | २,०६५.०१ | २,०६५.०१ | २,०६५.०१ |
| ७. | लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्याप्रमाणे राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव वगळून) | | | ३५३,२१९.६७ | ४०५,४८०.३५ | | | ३५३,९७९.६८ | ३९७,७९६.५२ |
| ८. | प्रति इक्विटी शेअर मूलभूत आणि पतलीकृत तोटा/उत्पन्न (प्रत्येकी रु. १ दर्शनी मूल्याचा शेअर) (रु.) ## | (३०.२४) | १.७६ | (२२.६५) | १०.८० | (२५.०९) | १.७५ | (१८.५४) | ९.८१ |

**आर्थिक निकालांसाठी टिपा:**

१. वरील माहिती ही सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत शेअर बाजारांमध्ये दाखल केलेल्या तिमाही आर्थिक निकालांच्या सविस्तर स्वरूपाचा उतारा आहे. तिमाही आर्थिक निकालांचे पूर्ण स्वरूप शेअर बाजारांच्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहेः www.bseindia.com आणि www.nseindia.com, तसेच कंपनीच्या संकेतस्थळावरः www.rhimagnesitaindia.com. खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करूनही ते पाहता येईल.
२. # इंड-एएस नियमांनुसार नफा आणि तोटा विवरणपत्रात समायोजित केलेली अपवादात्मक बाब.
३. ## ३१ मार्च, २०२६ आणि ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहींसाठी ईपीएस वार्षिकीकृत केलेला नाही.

संचालक मंडळाच्या वतीने आणि त्यांच्या आदेशाने
आरएचआय मॅग्नेसिटा इंडिया लिमिटेड
स्वाक्षरी/-
अझिम सय्यद
पूर्णवेळ संचालक आणि मुख्य वित्तीय अधिकारी
(डीआयएन – १०६४१९३४)

स्थळ : गुरुग्राम
दिनांक : २९ मे, २०२६


# भिवंडी महानगरपालिकेत ३१ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा गौरवपूर्ण निरोप समारंभ

**भिवंडी, दि. ३० (वार्ताहर) :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या ३१ कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या वतीने गौरवपूर्वक निरोप देण्यात आला. महानगरपालिकेचे आयुक्त अनमोल सागर यांच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या दीर्घ आणि उल्लेखनीय सेवेला मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महानगरपालिकेचे कर्मचारी कै. मिलिंद पातकर यांचे निवृत्तीपूर्वी निधन झाल्याने उपस्थितांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर निरोप समारंभास सुरुवात करण्यात आली. उपआयुक्त (सामान्य प्रशासन) शैलेश दोंदे आणि समाजकल्याण विभाग प्रमुख मिलिंद पळसुले यांच्या हस्ते सेवानिवृत्त तसेच स्वेच्छानिवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या तळमजल्यावर आयोजित या कार्यक्रमात आरोग्य, प्रशासन, बाजार, वाहनचालक, परिचारिका, माळी, शिपाई, मदतनीस, सुरक्षा रक्षक, मुकादम तसेच स्वच्छता विभागातील विविध पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश होता. अनेक वर्षे नागरिकांच्या सेवेसाठी योगदान दिलेल्या या कर्मचाऱ्यांच्या कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला.

या निरोप समारंभाला पर्यावरण विभाग प्रमुख निलेश संखे, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय तसेच विविध कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाकाळातील अनुभव व्यक्त करताना महानगरपालिकेतील सहकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.


## केजेएमसी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

KJMC FINSERV MONEY MATTERS

नोंदणीकृत कार्यालय: १६२, अटलांटा, १६ वा मजला, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२१
दूरध्वनी: +९१-२२-४०९४ ५५००; सीआयएन: एल६५१००एमएच१९८८पीएलसी०४७८७३
वेबसाइट: www.kjmcfinserv.com; ईमेल: investor.finance@kjmc.com

### ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षासाठी लेखापरीक्षित स्वतंत्र आर्थिक निकालांचा उतारा

(₹ लाखांत)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही ३१.०३.२०२६ (टीप ५ पहा) | संपलेली तिमाही ३१.१२.२०२५ अलेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३१.०३.२०२५ (टीप ५ पहा) | संपलेले वर्ष ३१.०३.२०२६ लेखापरीक्षित | संपलेले वर्ष ३१.०३.३०२५ लेखापरीक्षित |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कार्यातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ९१.६७ | १४५.२२ | २५.५२ | ६३२.९३ | ५२२.४१ |
| २. | कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | (१२.७१) | २८.९६ | (५२.२३) | २३४.५२ | ११९.७९ |
| ३. | करपुर्व निव्वळ नफा/(तोटा) | (१२.७१) | २८.९६ | (५२.२३) | २३४.५२ | ११९.७९ |
| ४. | करानंतर निव्वळ नफा/(तोटा) | (१६.८७) | १५.६६ | (४१.८७) | १६२.९६ | ८१.२३ |
| ५. | एकुण सर्वसमावेशक उत्पन्न | (३,२४६.२८) | (९०१.७९) | (२,०९४.९५) | (५,५५४.२३) | ३,१७०.४८ |
| ६. | भरलेले इक्विटी शेअर भांडवल | ४७८.५७ | ४७८.५७ | ४७८.५७ | ४७८.५७ | ४७८.५७ |
| ७. | पुनर्मूल्यांकन राखीव वगळून इतर इक्विटी | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | ७,९३२.५७ | १३,४८६.८१ |
| ८. | प्रति शेअर कमाई ₹१०/- (अंतरिम कालावधी करिता) | | | | | |
| | मुलभुत | (०.३५) | ०.३३ | (०.८७) | ३.४१ | १.७० |
| | सौम्यीकृत | (०.३५) | ०.३३ | (०.८७) | ३.४१ | १.७० |

टीप: १. वरील उतारा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजकडे सादर केलेल्या तिमाही आणि वर्षासाठीच्या लेखापरीक्षित अलिप्त वित्तीय निष्कर्षांच्या सविस्तर प्रारूपाचा एक भाग आहे.
२. वित्तीय निष्कर्षांचे पुनरावलोकन ऑडिट कमिटीद्वारे करण्यात आले असून शुक्रवार, दिनांक २९ मे, २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालासह त्यास मंजुरी देण्यात आली आहे.
३. सदर वित्तीय निष्कर्ष स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाइट्स म्हणजेच www.bseindia.com वर आणि कंपनीच्या www.kjmcfinserv.com या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.
४. मागील तिमाही/कालावधीचे आकडे जेथे आवश्यक असेल तेथे पुनर्गठित/पुनर्वर्गीकृत करण्यात आले आहेत.
५. ३१ मार्च, २०२६ आणि ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे आकडे हे संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित आकडे आणि संबंधित वित्तीय वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीपर्यंतचे प्रकाशित वर्षापासून आजवरचे आकडे यांमधील संतुलित आकडे आहेत.

### ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षासाठी लेखापरीक्षित एकत्रित आर्थिक निकालांचा उतारा

(₹ लाखांत)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही ३१.०३.२०२६ (टीप ५ पहा) | संपलेली तिमाही ३१.१२.२०२५ अलेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३१.०३.२०२५ (टीप ५ पहा) | संपलेले वर्ष ३१.०३.२०२६ लेखापरीक्षित | संपलेले वर्ष ३१.०३.३०२५ लेखापरीक्षित |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कार्यातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ९४.०४ | १६६.२६ | २१.३४ | ६८८.१९ | ५३६.७८ |
| २. | कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | (२४.७८) | ३८.१२ | (५६.९४) | २५०.०९ | १३१.३१ |
| ३. | करपुर्व निव्वळ नफा/(तोटा) | (२४.७८) | ३८.१२ | (५६.९४) | २५०.०९ | १३१.३१ |
| ४. | करानंतर निव्वळ नफा/(तोटा) | (२६.२४) | २१.९४ | (४६.५७) | १७२.५१ | ९२.२६ |
| ५. | एकुण सर्वसमावेशक उत्पन्न | (४,०६२.७१) | (१,५६९.७६) | (२,६३०.७१) | (७,४८९.७४) | ४,१२०.४७ |
| ६. | भरलेले इक्विटी शेअर भांडवल | ४७८.५७ | ४७८.५७ | ४७८.५७ | ४७८.५७ | ४७८.५७ |
| ७. | पुनर्मूल्यांकन राखीव वगळून इतर इक्विटी | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | ९,५२३.०१ | १६,८२९.४७ |
| ८. | प्रति शेअर कमाई ₹१०/- (अंतरिम कालावधी करिता) | | | | | |
| | मूलभूत | (०.५८) | ०.४८ | (१.०१) | ३.५७ | १.७७ |
| | सौम्यीकृत | (०.५८) | ०.४८ | (१.०१) | ३.५७ | १.७७ |

टीप: १. वरील उतारा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजकडे सादर केलेल्या तिमाही आणि वर्षासाठीच्या लेखापरीक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या सविस्तर प्रारूपाचा एक भाग आहे.
२. वित्तीय निष्कर्षांचे पुनरावलोकन ऑडिट कमिटीद्वारे करण्यात आले असून शुक्रवार, दिनांक २९ मे, २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालासह त्यास मंजुरी देण्यात आली आहे.
३. सदर वित्तीय निष्कर्ष स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाइट्स म्हणजेच www.bseindia.com वर आणि कंपनीच्या www.kjmcfinserv.com या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.
४. मागील तिमाही/कालावधीचे आकडे जेथे आवश्यक असेल तेथे पुनर्गठित/पुनर्वर्गीकृत करण्यात आले आहेत.
५. ३१ मार्च, २०२६ आणि ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे आकडे हे संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित आकडे आणि संबंधित वित्तीय वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीपर्यंतचे प्रकाशित वर्षापासून आजवरचे आकडे यांमधील संतुलित आकडे आहेत.

मंडळाच्या वतीने
केजेएमसी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड
रजनेश जैन
पूर्णवेळ संचालक
डीआयएन: ००१५१९८८

ठिकाण: मुंबई
दिनांक: २९ मे, २०२६


